अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# राहुल गांधी आणि नरेंद्र मोदी यांची तुलनाच नको

दिल्लीत भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेस या दोन्ही मोठ्या राष्ट्रीय पक्षांच्या मोठ्या बैठका नुकत्याच पार पडल्या. त्यात झालेल्या नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांच्या भाषणाची तितकीच जोरदार चर्चा देशभर सुरू आहे. राहुल गांधी यांचा आक्रमकपणा काँग्रेसला आणि लोकांना पहिल्यांदाच पहायला मिळाला. तर नरेंद्र मोदी यांनी कसलेल्या राजकारणी नेत्याप्रमाणे मुद्देसूद भाषण करून लोकांची मने जिंकण्याचा प्रयत्न केला. एक गोष्ट तर स्पष्टपणे दिसून येते, या दोघांच्याही भाषणांची एक तर सरळ सरळ तुलना होऊ शकत नाही. कारण राहुल गांधी हे मोदींपेक्षा वयाने बरेच लहान आहेत आणि राजकारणातलाही अनुभव कमी आहे. तरीसुध्दा ते मोदींना अधिकाधिक आव्हान देण्याचा प्रयत्न करीत आहेत. सर्वांत महत्त्वाची राहुल गांधींची जमेची बाजू म्हणजे नरेंद्र मोदींना त्यांच्या मुद्द्यांची किंवा भाषणांची दखल घ्यावी लागते. भाजपाच्या पंतप्रधानपदाच्या उमेदवाराला राहुल गांधींच्या भाषणाला उत्तर देण्याची वेळ येते ही गोष्टदेखील महत्त्वाची मानावी लागेल. आज भलेही राहुल गांधी यांचे नाव काँग्रेसने पंतप्रधानपदासाठी घोषित केलेले नाही. परंतु उद्या काँग्रेसला जर बहुमत मिळाले तर राहुल गांधी हेच पंतप्रधानपदाचे उमेदवार असतील हे आता स्पष्ट झालेले आहे. कदाचित बदलत्या वातावरणाचा अंदाज घेऊन काँग्रेस येणाऱ्या निवडणुकीत कोणत्याही नावाची घोषणा न करता जिंकण्याचा प्रयत्न करेल. कारण यापूर्वी सुध्दा सोनिया गांधी यांनी स्वत:च्या ताकदीवर काँग्रेसला पराभवाच्या गर्तेतून बाहेर काढले होते. त्यावेळी सोनिया गांधी यांचे नावदेखील पंतप्रधानपदासाठी घोषित झालेले नव्हते. निवडणूक जिंकल्यानंतर त्यांच्या नावाला विरोध झाला. त्यावेळी मनमोहनसिंग यांचे नाव पुढे आले. कदाचित आतादेखील सोनिया गांधींनी असाच विचार केला असावा. म्हणून राहुल गांधींना प्रचार प्रमुखपदाची जबाबदारी दिली असावी. याचाच अर्थ असा होतो की, यावेळची लोकसभा निवडणूक राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली लढवली जाईल. त्यातून हळूहळू त्यांच्याकडे संपूर्ण काँग्रेस पक्षाची धुरा सोपविली जाईल. निवडणुकीतल्या यशापयशाचा अंदाज घेऊन त्यांना पंतप्रधानपदाची गळही घातली जाईल.

## काँग्रेस आपल्याच कात्रीत

खरे सांगायचे तर काँग्रेस पक्षामध्ये नेतृत्व हा मुद्दा फारसा महत्त्वाचा ठरत नाही. पंतप्रधान कोणी झाले तरी नेतृत्व आणि कर्तव्य गांधी घराण्याकडे राहत असते. नरसिंहराव पंतप्रधान झाले त्यावेळीसुध्दा गांधी घराण्याचा वरचष्मा होता. मनमोहन सिंगांचे काही विचारायलाच नको. सोनिया गांधींच्या इशाऱ्याप्रमाणे वागणे आणि बोलणे तेव्हढेच त्यांच्याकडे काम होते. अशा परिस्थितीत आता राहुल गांधी यांनाच सर्व प्रकारची जबाबदारी देऊन पंतप्रधानपदही त्यांच्याकडे सोपविण्याची तयारी काँग्रेसला करणे भाग होते. त्याशिवाय दुसरा पर्यायच शिल्लक नाही. या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला पराभवाचे तोंड पहावे लागले तरी अगामी काळामध्ये राहुल गांधी हेच काँग्रेसचे सर्वे सर्वा राहतील आणि पंतप्रधान म्हणूनही त्यांचीच प्रतिमा उभी केली जाईल. दिल्लीतल्या बैठकीत असेच प्रतिमा निर्मितीचे काम झाले. काँग्रेसची मदार आता राहुलवर आहे हे त्यातून स्पष्ट केले गेले. दिल्लीत याच काळामध्ये भारतीय जनता पार्टीने आपल्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक बोलावून मोदींच्या नामघोषाबरोबरच पक्षाचा निवडणुकीतील जाहिरनामा कसा असेल, याची झलक दाखविली गेली. त्यामध्ये लोकांना आरोग्य विम्यापासून ते महागाई रोखण्याकरिता स्वतंत्र निधी स्थापन करण्यापर्यंत घोषणा केल्या गेल्या. लोकशाहीचे बळकटीकरण करणे, देशातील १०० शहरांना अत्याधुनिक म्हणजे स्मार्ट बनविणे, काळा पैसा भारतात आणणे, युवा शक्तीचा उपयोग करून घेणे, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा म्हणून राष्ट्रीय कृषी बाजारपेठेची स्थापना भाजपाचे सरकार आल्यावर केली जाईल अशी स्वप्ने दाखविली गेली आहेत. अर्थात मोंदी यांना गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाचा प्रदीर्घ अनुभव आहे. विकासाविषयी त्यांच्याकडे काहीना काही दृष्टिकोन आहे. म्हणून त्याच्या या स्वप्नांकडे देशातील नागरिक थोडेफार आशेने पाहू शकतात. परंतु मोदी म्हणतात तसे जसेच्या तसे होईलच, त्याची खात्री मात्र देता येत नाही.

## भाषणे नको कार्यक्रम पहा

राहुल गांधी आणि नरेंद्र मोदी यांची व्यक्तिगत तुलना न करता किंवा त्यांच्या भाषणापेक्षा दोन्ही राष्ट्रीय पक्ष कशा पध्दतीने विचार करीत आहेत हे लक्षात घ्यावे लागेल. काँग्रेस भ्रष्टाचार आणि महागाईसारख्या मुद्द्यांमुळे कात्रीत सापडली आहे. कदाचित राहुल गांधींचा करिश्मा चालून गेला तर आपले नुकसान टाळू शकतो. आज काँग्रेसने नरेंद्र मोदी किंवा भाजपा यांच्यावर टीकेचा प्रहार चालविला आहे. त्यापेक्षा झालेल्या चुका टाळून काँग्रेसचे नवे सरकार नवा विकास कसा घडविणार हे सांगितले गेले पाहिजे. भारतीय जनता पार्टीने मोदी यांना प्रोजेक्ट करीत असतानाच भाजपाचे सरकार सत्तेत आले तर ते जनतेला काय देईल हेदेखील सांगायला सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड या तिन्ही राज्यामध्ये भाजपाचे सरकार तीन वेळा निवडून आले. राजस्थानमध्ये काँग्रेसचा धुव्वा उडविला गेला. या गोष्टी लोकांच्या मनावर प्रभाव टाकणाऱ्या ठरतात. राहुल गांधींचे राजकारणातले पदार्पण हे नवे असल्यामुळे लोकांना ते कितपत पसंत पडेल याबद्दल शंका आहे. मात्र भाजपा या सगळ्या परिस्थितीचा फायदा घेऊन आपले बळ वाढवू शकतो अशी आज परिस्थिती आहे. म्हणूनच राहुल गांधी किंवा नरेंद्र मोदी या दोघांची तुलना करण्यापेक्षा भाजपा आणि काँग्रेस यांच्यातील कार्यक्रम तपासले गेले पाहिजेत. त्यातून जनतेला थोडाफार अंदाज येऊ शकेल. आज लोकांना स्वच्छ कारभार देणारे तसेच त्यांचा विश्वास संपादन करणारे नेते आणि राजकीय पक्ष हवे आहेत. सत्तेसाठी हपापलेले आणि सामान्य जनतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या नेत्यांविषयी लोकांच्या मनामध्ये चीड उत्पन्न झाली आहे. लोकांच्या या भावनेचा आदर करायचा असेल किंवा त्यांच्या या इच्छेचा सन्मान करायचा असेल तर प्रामुख्याने काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टी या दोन मोठ्या राजकीय पक्षांनी आपल्या चालचलन आणि चरित्रामध्ये बदल केला पाहिजे. लोकांच्या मतासाठी जर त्यांनी पारदर्शकता आणि प्रामाणिकपणाची किंमत मोजली तरच त्यांचा लाभ होऊ शकतो.